| MHST150014542024 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | १०.१०.२०२४ |
| | नोंदणी दिनांक | : | १०.१०.२०२४ |
| | निकाल दिनांक | : | ०९.०६.२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०१ ०७ ३० |

**वडूज येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी**
**तालुका खटाव, जिल्हा सातारा यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : एम.आय.एस. दर्यावर्दी)**
(न्यायनिर्णय : दिनांक ०९.०६.२०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७०६/२०२४** **निशाणी क्र. ८ खाली**

**प्रथम खबरी अहवाल/गुन्हयाचा तपशील –**
गुन्हा नोंद क्र. : १८५/२०२४
पोलीस ठाणे : औंध पोलीस ठाणे

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत प्रभारी अधिकारी औंध पोलीस ठाणे<br>तालुका खटाव, जिल्हा सातारा. |
| **सरकारी अभियोक्ता** | श्री. पी. व्ही. जोशी. |
| **आरोपी** | **भिमराव श्रीरंग डोईफोडे,**<br>वय : ४६ वर्षे, धंदाः मजुरी,<br>रा– भुषणगड, ता. खटाव, जि. सातारा. |
| **आरोपीतर्फे वकील** | श्री. ए. डी. घाडगे. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ३१.०७.२०२४ |
| प्रथम खबर अहवाल दाखल झाल्याचा दिनांक | ३१.०७.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १०.१०.२०२४ |

| | |
|---|---|
| आरोपीचे प्रतिकथन नोंदविलेचा दिनांक | ११.०२.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १३.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | ०९.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०९.०६.२०२६ |
| शिक्षा सुनावल्याचा दिनांक, असल्यास | -- |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनवर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेले गुन्हे | आरोपीस शिक्षा किंवा निर्दोष मुक्त केले. | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ नुसार संपरिक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **भिमराव श्रीरंग डोईफोडे** | कलम ४१ अ सीआरपीसी प्रमाणे नोटिस | ११.०२.२०२५ | म. दा. का कलम ६५ ई अन्वये | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

## अभियोगपक्ष, बचावपक्ष, न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोगपक्षाचे साक्षीदार

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | किरण नामदेव हिरवे | फिर्यादी |
| २ | दत्तात्रय खंडू कुंभार | जप्ती पंच |

### ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असल्यास–

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचावपक्ष, न्यायालयीन निशाणींची यादी**

**अ. अभियोगपक्ष–**

| अ.क्र. | निशाणी क्र. | निशाणी क्रमांकाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | १४ | फिर्याद |

**ब. बचावपक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्र. | निशाणी क्रमांकाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी –**

| अ.क्र. | निशाणी क्र. | निशाणी क्रमांकाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**मुद्देमालाचा तपशील**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| १. | १२/२०२४ | देशी दारू पहिली धार संत्रा असे लेबल असलेल्या १८० मिलीच्या १४ सिलबंद बाटल्या. |

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदयाचे कलम ६५–ई अन्वये सदरचा गुन्हा दाखल केला आहे.

०२. **अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे**:–

फिर्यादी किरण नामदेव हिरवे यांनी फिर्याद दिली की, दि. ३१.०७.२०२४ रोजी पोलीस ठाण्यात हजर असताना पोलीस उपनिरीक्षक ठिकणे साहेब यांना बातमी मिळाली की, मौजे भुषणगड, तालुका खटाव गावचे हद्दीत आरोपी भिमराव श्रीरंग डोईफोडे हा पार्थ रेस्टॉरंटच्या आडोशाला विनापरवाना बेकायदेशीर देशी दारूची चोरटी विक्री करीत आहे. त्याप्रमाणे फिर्यादी व इतर

पोलीस कर्मचारी हे खाजगी वाहनाने बातमीच्या ठिकाणी गेले. त्यांनी दोन पंचाना बोलवून त्यांना घटनेचा आशय समजावून सांगितला. त्यानंतर ते सर्वजण बातमीच्या ठिकाणी गेले. तेथे एक इसम पुढयात एक पांढऱ्या रंगाची प्लास्टीकची पिशवी घेऊन बेकायदेशीर बिगर परवाना दारूची विक्री करण्याच्या उद्देशाने बसला होता. त्याला त्यांनी जागीच पकडले. त्याचे नाव विचारले असता त्याने भिमराव श्रीरंग डोईफोडे असे सांगितले. त्याच्या ताब्यातील पिशवीमध्ये देशी दारू पहिली धार संत्रा असे लेबल असलेल्या १८० मिलीच्या १४ सिलबंद बाटल्या मिळून आल्या. तेथे महिला पोलीस नाईक काळभोर यांनी दोन पंचांसमक्ष तो मुद्देमाल जप्त करून त्याचा जप्ती पंचनामा केला. त्यानंतर तो मुद्देमाल व आरोपीला घेऊन ते पोलिस स्टेशनला आल्यानंतर फिर्यादीने घटनेची फिर्याद दाखल केली.

**०३.** आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी प्रतिबंधक कायदा चे कलम ६५–ई अन्वये गुन्हा क्र. १८५/२०२४ नोंदवुन पुढील तपास महिला पोलीस हवालदार, एस. व्ही. खाडे यांचेकडे देण्यात आला. तपासादरम्यान आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळाल्याने आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** या खटल्याममध्ये आरोपी हजर झालेवर निशाणी ८ वर महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५–ई अन्वये आरोपीचे निवेदन नोंदवण्यात आले. आरोपीने आरोप नाकारुन संपरिक्षेला सामोर जाण्याची पसंती दर्शविली.

**०५.** प्रस्तुत प्रकरणात आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे निवेदन निशाणी १५ वर नोंदवले असता आरोपीने त्याचेविरुध्द खोटी केस केली असल्याचा बचाव घेतला.

**०६.** अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपी यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** उपलब्ध पुरावा व आरोपीचा बचाव पाहता माझे विचाराधीन खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने असे शाबीत केले आहे काय की, दिनांक ३१.०७.२०२४ रोजी १९.०० वाजण्याच्या सुमारास मौजे भुषणगड, ता. खटाव येथे आरोपीने स्वतःच्या फायदयासाठी विनापरवाना बेकायदेशीररित्या देशी दारू बाळगताना मिळुन आला ? | नकारार्थी |
| २ | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

**–:– <u>का र ण मि मां सा</u> –:–**

**०८.** प्रस्तुत खटल्यात आरोपी हा विनापरवाना बेकायदेशीररित्या अवैध दारु चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगुन होता. त्यामुळे गु. र. क्र. १८५/२०२४ नोंदविण्यात आला. अभियोगपक्षातर्फे निश्चीत केलेले दोषारोप शाबीत करण्याकरिता अभियोगपक्षातर्फे प्रकरणात फक्त दोन साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली.

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u>:–**

**०९.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला सा. क्र. १ किरण नामदेव हिरवे यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले आहे की, दिनांक ३१.०७.२०२४ रोजी ते औंध पोलीस स्टेशन अंतर्गत पुसेसावळी पोलीस दूरक्षेत्र येथे पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होते. त्यावेळी पेट्रोलिंग करीत असताना पोलीस कॉन्सटेबल गोडसे, टिंगरे, महिला पोलीस हवालदार खाडे त्यावेळी पोलीस उपनिरीक्षक टिकणे यांनी त्यांना खास बातमीदारामार्फत गुप्त बातमी मिळाली. मौजे भूषणगड गावच्या हद्दीत पार्थ रेस्टॉरंटच्या आडोशाला भिमराव श्रीरंग डोईफोडे हे बेकायदेशीर दारूची विक्री करीत

आहे. सदर बातमीवरुन ते दोन पंचांना बोलावुन घेतले व त्यांना सदर बातमी समजुन सांगितली. त्यानंतर ते मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी खाजगी वाहनाने जाऊन दोन पंचासमक्ष छापा मारणे कामी खाजगी वाहनाने गेले असता, सदर ठिकाणी त्यांना एक इसम आढळून आला. त्याला त्यांनी जागीच पकडले. त्याला ताब्यात घेवुन त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने भिमराव श्रीरंग डोईफोडे असे सांगितले. त्याच्याकडे दारू विक्रीचा परवाना नव्हता. त्यानंतर त्याच्या ताब्यात असलेल्या पांढ–या पिशवीतील देशी दारु पहिली धार संत्रा असे लेबल असलेल्या १८० एम. एल च्या १४ बाटल्या मिळुन आल्या व तो मुद्देमाल जप्त केला. त्यापैकी एक सि.ए करीता बाटली राखुन ठेवली व सदर मुद्देमालाचा दोन पंचासमक्ष महिला पोलीस हवालदार खाडे यांनी जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर ते मुद्देमालासह आरोपीस पोलीस स्टेशनला येवुन आरोपी विरुध्द फिर्याद (नि. १४) दिली.

**१०.** आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान साक्षीदाराने मान्य केले की, फिर्यादमध्ये घटनास्थळाची चतुःसिमा नमूद केलेली नाही. तसेच घटनास्थळाच्या मालकीचे कागदोपत्री पुरावा याकामी सादर केलेला नाही. तसेच त्यांनी मान्य केले की, ते ज्या खाजगी वाहनाने गेले होते त्याचा नंबर त्यांना सांगता येणार नाही. सदर साक्षीदाराने इतर सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

**११.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला सा. क्र. २ दत्तात्रय खंडू कुंभार यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले आहे की, दिनांक ३१.०७.२०२४ रोजी तो निमसोड येथे देवाला गेला होता. त्यावेळी तेथे हॉटेलवर छापा पडला होता. तेथे देशी दारु संत्रा व टँगो पंच दारु मिळाली होती. पोलीसांनी दारुचे काय केले हे मला माहीत नाही. जप्ती पंचनाम्यावर साक्षीदाराने त्याची सही असल्याचे सांगितले परंतु त्यातील मजकुर माहित नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदार हा अभियोगपक्षास मदत करीत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांनी त्याच्या उलटतपासाची परवानगी घेतली. सदर साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले की, हॉटेल पार्थ येथे छापा पडला होता व तो छापा भिमराव श्रीरंग डोईफोडे यांच्यावर पडला होता. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने मान्य

केले की, पंचनामा कधी केला हे त्याला सांगता येणार नाही. पंचनामा किती वाजता सुरु होऊन किता वाजता संपला हे त्याला सांगता येणार नाही. त्याच्यासोबत दुसरे पंच कोण होते हे त्याला सांगता येणार नाही. तसेच त्याने मान्य केले की, निमसोडहून तो येत असताना तेथे पोलीस थांबले होते व त्यांनी त्याला बोलावून त्यांनी त्याची एका कागदावर सही घेतली होती. पंचनाम्यात काय लिहले आहे त्यातील मजकूर त्याला माहित नाही. हॉटेल कोणाच्या मालकीचे होते हे त्याला माहित नाही. कोणाच्या ताब्यातून दारु सापडली हे त्याला माहित नाही. तसेच त्याने तो आज रोजी आरोपीला पहिल्यांदा पाहत असल्याचे सांगितले.

**१२.** अभियोगपक्षाचा पुरावा पाहता अभियोगपक्षाने फिर्यादी व पंच यांची साक्ष अभिलेखावर नोंदवलेली आहे. अभिलेखावर पोलिस साक्षीदाराव्यतिरीक्त स्वतंत्र साक्षीदाराचा पुरावा म्हणजेच पंचाचा पुरावा अभियोगपक्षास सहाय्य करीत नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा संशयापलीकडे शाबित झाला नाही. गुन्हयातील घटनास्थळ असलेले ठिकाण आरोपीच्या मालकीचे असल्याबाबत कोणताही कागदोपत्री अथवा तोंडी पुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर सादर केलेला नाही. तसेच घटनास्थळाच्या आजुबाजूच्या साक्षीदाराचे जबाब  नोंदवले नाहीत.

**१३.** प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने जप्त मुद्देमाल रासायनिक परीक्षणाचा अहवाल अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे जप्त केलेला मुद्देमाल ही दारु होती हे गृहीत धरणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा महाराष्ट्र दारु बंदी कायदयाप्रमाणे मादक द्रव्य असुन आरोपी सदर मादक द्रव्य बाळगलेल्या स्थितीत मिळुन आला व तो मादक द्रव्याची विक्री करीत होता असे गृहीत धरणे उचीत होणार नाही. अभियोगपक्षाच्या पुराव्यावरुन आरोपीविरुध्द केलेले आरोप संशयापलीकडे शाबित होत नाहीत. अशा परिस्थितीत आरोपीस दोषमुक्त करणे न्यायोचित ठरते. सबब अभियोगपक्ष आरोपीविरुध्दचे दोषारोप संशयापलीकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. वरील सर्व पुराव्यावरुन आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा शाबीत होत नसल्यामुळे मी मुद्दा क. ०१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>:–**

**१४.** अभियोगपक्षाने मुद्दा क्र. १ च्या निष्कर्षावरुन आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहे. जप्त मुद्देमाल देशी दारू पहिली धार संत्रा असे लेबल असलेल्या १८० मिलीच्या १४ सिलबंद बाटल्या अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, सातारा यांना कायद्याप्रमाणे विल्हेवाट करणेबाबत आदेशीत करणे योग्य होईल. सबब, मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

–: **<u>आ दे श :–</u>**

१. आरोपी भिमराव श्रीरंग डोईफोडे यांची महाराष्ट्र दारुबंदी कायदयाचे कलम ६५–ई मधुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल देशी दारू पहिली धार संत्रा असे लेबल असलेल्या १८० मिलीच्या १४ सिलबंद बाटल्या अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, सातारा यांना कायद्याप्रमाणे विल्हेवाट करणेसाठी पाठवावा.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ च्या पुर्ततेकामी रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तीक जात मुचलका व त्याच रकमेचा एक जामीनदार सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला.)

MOHAMMED IMRAN DARYAWARDI
Digitally signed by MOHAMMED IMRAN DARYAWARDI
Date: 2026.06.09 17:08:43 +0530

ठिकाण : वडूज.                (एम.आय.एस.दर्यावर्दी)
दिनांक : ०९.०६.२०२६.          न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
वडूज, जि. सातारा.

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी प्रमाणीत करते की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द–न–शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – आर. के. माने
न्यायालयाचे नांव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वडूज.

स्वाक्षरीत/–
लघुलेखक–III